राबोडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग,. ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ८३ /२०२६ दि. २३/०४/२०२६

"वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

ज्याअर्थी, ठाणे वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रातील राबोडी वाहतुक उप विभाग हद्दीमध्ये दिनांक १४/०४/२०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३५ व्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम होणार आहे. तसेच सदर कार्यक्रमा निमीत्ताने दिनांक १५/०४/२०२६ रोजी ते दिनांक १७/०४/२०२६ रोजी सकाळी १०:०० ते रात्रौ २२:००वाजे पावेतो लहान मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम, मनोरंजन, गीतगायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमानिमीत्त मोठया प्रमाणात अनुयायांची तसेच प्रेक्षकांची गर्दी होणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊन नागरीकांची गैरसोय होवू नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

प्रवेश बंद – १) कॅडबरी व नौपाडा कडुन डॉ. आंबेडकर रोडकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **खोपट** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येते आहे.

पर्यायी मार्ग– **अ)** सदरची वाहने ही खोपट कडुन डावे वळण घेवून कोलबाड रोड मार्गे मिनाताई ठाकरे चौक येथुन उजवे वळण घेवुन हॉलीक्रॉस स्कुल मार्गे इच्छित स्थळी जातील.
ब) सदरची वाहने ही खोपट कडुन उजवे वळण घेवून चरईकट मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) डॉ.आंबेडकर रोड कडून खोपट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. आंबेडकर रोड कट** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येते आहे.

पर्यायी मार्ग– सदरची वाहने ही सरळ जावून उथळसर रोड मार्गे उथळसर नाक्या वरून लहान वाहने डावे वळण घेवुन कोलबाड नाका मार्गे व मोठी वाहने मिनाताई ठाकरे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

पार्किंग मनाई – आंबेडकर रोड परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजुस वाहने **पार्किंग करण्यास मनाई** करण्यात येत आहे.

सदरची वाहतूक अधिसुचना **दि. १४/०४/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. ते दि. १७/०४/२०२६ रोजी कार्यक्रम संपे पर्यंत** अंमलात राहिल.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहीका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागु राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग,ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/ विशेष शाखा,ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई/बृन्मुबई महानगरपालिका.

विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. राबोडी, नौपाडा, ठाणेनगर वाहतूक उपविभाग ठाणे.